सूचना का अधिकार

# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
## बृहन्मुंबई खंडपीठ

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

**अपील क्र. MHSICMU/२०२२/M/००२२९०**

**अपिलार्थी श्री. राजेंद्र मधुकरराव बरके**

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी**
राज्य पोलीस तक्रार प्राधिकरण, ४ था मजला, कूपरेज टेलिफोन एक्सचेंज,
MTNL इमारत, कूपरेज फूटबॉल मैदानासमोर,
महर्षी कर्वे रोड, नरीमन पॉईंट, मुंबई-४०० ०२१

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा मुख्य प्रशासकीय अधिकारी**
राज्य पोलीस तक्रार प्राधिकरण, ४ था मजला, कूपरेज टेलिफोन एक्सचेंज,
MTNL इमारत, कूपरेज फूटबॉल मैदानासमोर,
महर्षी कर्वे रोड, नरीमन पॉईंट, मुंबई-४०० ०२१

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : १६.०१.२०२३**

अपीलकर्ता : अनुपस्थित (ट्रॅकिंग रिपोर्टप्रमाणे दि. ११.०१.२०२३ रोजी नोटीस प्राप्त झाली आहे.)

विद्यमान जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपिलीय अधिकारी : उपस्थित

| मूळ अर्ज दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याचा उत्तराचा दिनांक | प्रथम अपील दिनांक | प्रथम अपील आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| १७.०९.२०२१ | २०.१०.२०२१ | ०१.११.२०२१ | - |

अपिलार्थी यांनी आयोगाकडे दि. २४.०२.२०२२ रोजीच्या अर्जान्वये माहिती मिळालेली नाही असे कारण नमुद करुन द्वितीय अपील दाखल केले आहे.

अपिलार्थी यांनी त्यांचा अर्ज दि. १७.०९.२०२१ अन्वये खालील माहिती विचारलेली आहे व जन माहिती अधिकारी यांनी त्यांचे पत्र दि. २०.१०.२०२१ अन्वये अपिलार्थींना खालीलप्रमाणे उत्तर दिलेले आहे:-

| विचारलेली माहिती | पुरविण्यात आलेली माहिती |
|---|---|
| केंद्रीय माहिती अधिकार कायदा, २००५ मधील कलम ४(१)(क) व (ख) सार्वजनिक प्राधिकरणावरील आंबधणे मध्ये नमुद आपल्या कार्यालयाची माहिती स्वयंप्रणेने प्रसिध्द व प्रसारित करणे बंधनकारक करण्यात आलेली आहे. तरी सदरील आपल्या कार्यालयाची माहिती लेखी स्वरुपात साक्षांकित करुन मिळणेबाबत. | सदर तरतूदीनुसार माहिती अधिसूचित करण्यासाठी कार्यालयाची स्वतंत्र वेबसाईट करण्याचा प्रस्ताव शासनाकडे सादर झालेला असून या कार्यालयाच्या वेबसाईटचे कार्यान्वयन झाल्यानंतर सदर माहिती अधिसूचित करण्यात येणार आहे. |

**अपील क्र. MHSICMU/२०२२/M/००२२९०**

अपिलार्थी यांनी त्यांच्या व्दितीय अपील अर्जासोबत जन माहिती अधिकारी यांचे पत्र दि. २०.१०.२०२१ संलग्न केलेले आहे.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी कोणतीही सुचना न देता अनुपस्थित असून जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी दिलेले उत्तर योग्य नाही. कारण कलम ४(१)(ख) अंतर्गत माहिती कायदा अस्तित्वात आणण्याचे १२० दिवसांत प्रकाशित करणे बंधनकारक आहे. फक्त संकेतस्थळावर प्रकाशित करणे, ते माध्यम नाही. संकेतस्थळावर प्रकाशित करणे आवश्यक आहे. तथापि, संकेतस्थळ कार्यान्वित झालेला नसेल तर माहिती कार्यालयाच्या भींतीवर प्रकाशित करणे आवश्यक आहे. जन माहिती अधिकारी यांनी कलम ४(१)(ख) अंतर्गतची माहिती ७ दिवसांत प्रकाशित करावी व याबाबत अपिलार्थींना सुचित करावे. जन माहिती अधिकारी यांनी प्रकाशित माहिती वेळोवेळी अद्ययावत करावी.

या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग पुढील आदेश देत आहे:

**आदेश**

**१) जन माहिती अधिकारी यांनी वरील विवेचनानुसार कार्यवाही करावी.**

**२) अपील निकाली काढण्यात येत आहे.**

State Information Commission Greater Mumbai

मुंबई
दिनांक : १७.०१.२०२३

(सुनील पोरवाल)
राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई